विभाग क्रमांक -
सरकारी मुल्यांकन रुपये -
स्टॅम्प रुपये -
नोंदणी फी रुपये -

बक्षिस पत्र

बक्षिस पत्र आज दिनांक_______ रोज ____________वार माहे डिसेंबर सन २०२३ ते दिवशी नाशिक मुक्कामी

| | |
|---|---|
| श्री. विश्वजित सतिश पाटील<br>वय २४ वर्षे, धंदा-व्यापार<br>पॅन- ईपीएमपीपी ९९७७ क्यु<br>आधार नं. ५३३८ १२२५४४६५<br>मोबाईल नं. ९६९९७४१९२८<br>ईमेल-vishwajitpatil100@gmail.com<br>रा. घर नं. ५४९, बंगला नं. १<br>श्रीकृष्ण कॉलनी, सोयगांव<br>ता. मालेगांव जि. नाशिक-४२३२०३ | लिहून घेणार |

यांसी

| | |
|---|---|
| श्री. प्रशांत ओंकार पाटील<br>वय ५२ वर्षे, धंदा- व्यापार<br>पॅन- एएफओपीपी ३७९७ ई<br>आधार नं. २४४२ ५६०५ ८८२५<br>मोबाईल नं. ९४२२२५८५६६<br>ईमेल-prashantonkarpatil@gmail.com<br>रा. बंगलो नं. १, श्रीकृष्ण कॉलनी, सोयगांव<br>ता. मालेगांव जि. नाशिक-४२३२०३ | लिहून देणार |

यांसी

| | |
|---|---|
| सौ. शितल प्रशांत पाटील<br>वय ४५, धंदा-<br>पॅन- एडब्ल्युटीपीपी २५८३ एल<br>आधार नं. ९३९३ ६४०३ ७७११<br>रा. बंगलो नं. १, श्रीकृष्ण कॉलनी,<br>सोयगांव ता. मालेगांव,<br>जि. नाशिक-४२३२०३ | संमती देणार |

**कारणे बक्षिस पत्र लिहुन देतो पैसा जे की,**

या पुढे या दस्तात लिहुन घेणार यांचा उल्लेख "तुम्हीं/तुमचे/लिहुन घेणार" असा तर लिहुन देणार यांचा उल्लेख "मी/आम्हीं/आमचे/ लिहून देणार" आणि संमती देणार यांचा उल्लेख "संमती देणार" असा केलेला आहे. या संज्ञां मध्ये या प्रत्येकाचे वंशवारस, कुटूंबीय, प्रतिनिधी, मुखत्यार, असाईनीज ई. या सर्वांचा समावेश आहे.

१. मिळकतीचे वर्णन-

अ. तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका मालेगांव पैकी, मौजे दाभाडी येथील स्थावर बिनशेती मिळकत जुना गट नंबर १५३०/१/१ याचा हल्लीचा गट नंबर १५३०/१/१/१, यासी क्षेत्र ०१ हे. १८ आर म्हणजेच ११८०० चौरस मीटर यासी चतुःसिमा येणे प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | पांजरापोळ गोशाळा यांचे क्षेत्र यासी गट न. १५३०. |
| पश्चिमेस | - | मूरमुरा कारखाना नावे साई इंडट्रीज यासी<br>गट नंबर १५३०/१/३ |
| दक्षिणेस | - | गट नंबर १५३०/१/२ |
| उत्तरेस | - | रावळगांव रस्ता |

ब. वर कलम १अ यात वर्णन केलेल्या मिळकती पैकी **बिनशेती क्षेत्र २५०० चौरस मीटर** यासी चतुः सिमा येणे प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | पांजरापोळ गोशाळा यांचे क्षेत्र यासी गट न. १५३० |
| पश्चिमेस | - | गट नंबर १५३०/१/१/१ यापैकी उर्वरित क्षेत्र ९३०० स्क्वे.मी. |
| दक्षिणेस | - | गट नंबर १५३०/१/२ |
| उत्तरेस | - | रावळगांव रस्ता. |

येणे प्रमाणे चतुःसिमा पुर्वक मिळकत यात जाण्या येण्याचे वाग वहिवाटीचे हक्कासह, यातील जल, तरु, तृण, काष्ट, पाषाणी, निधी निक्षेपासह व इतर तदंगभुत वस्तु हक्कासह मिळकती दरोबस्त सदर क्षेत्रात जाणेयेणे साठी उत्तर दिशेने पश्चिमे लगत १५ मी. रुंदीचा रावळगाव रस्ता आहे.

२) वर कलम १अ यात वर्णन केलेले संपूर्ण बिनशेती क्षेत्र म्हणजेच ११८०० चौ.मी. क्षेत्र ही संपूर्ण मिळकत लिहुन देणार यांची स्वकष्टार्जीत स्वसंपादित खरेदी मालकीची असुन सदरची मिळकत लिहुन देणार यांनी सौ. कृष्णा पवनकुमार अग्रवाल यांचे पासुन मे. दुय्यम निबंधक साहेब मालेगांव-१ यांचे कार्यालयात दस्त क्रमांक ५८५३ अन्वये दिनांक ४/९/२००२ रोजीच्या कायम फरोक्त खरेदीखताने खरेदी घेतलेली आहे. तेव्हा पासुन मिळकत माझे प्रत्यक्ष कबजे उपभोग वहिवाटीत असुन मिळकतीचा मला माझे इच्छे प्रमाणे उपभोग घेण्याचा अगर विल्हेवाट लावण्याचा हक्क व अधिकार आहे. मिळकतीचे ७/१२ सदरी मालक व कबजेदार म्हणून माझे नांव ६ड फेरफार नोंद क्र ८२१३ दिनांक ०८.०६.२००२ अन्वये आजही दाखल आहे.

३) वर कलम १अ मधील वर्णन केलेली मिळकत मे. उपविभागिय अधिकारी साहेब मालेगांव यांचेकडील हुकूम नंबर जमा-१/ एनएएसआर ४२-क/ ११/२०२१ दिनांक १९/७/२०२१ अन्वये वाणिज्य औद्योगिक प्रयोजनार्थ बिनशेती कडे वर्ग झालेली आहे. त्या बाबत ६ड फेरफार नोंद क्र. २१८२२ दिनांक २२.०७.२०२१ रोजीची करण्यात आलेली आहे.

४) वर कलम १अ मधील मिळकत विनशेती झाल्यानंतर मे. तहसिलदार यांचेकडील आदेशानुसार जुना गट नंबर १५३०/१/१ या मिळकतीस नविन गट नंबर १५३०/१/१/१ असा देण्यात आलेला आहे त्याबाबत ६ड फेरफार नोंद क्र. २२८१० दिनांक ०८.०३.२०२२ रोजीची करण्यात आलेली आहे.

५) लिहुन घेणार हा लिहुन देणार यांचा सख्खा पुतण्या आहे तसेच लिहुन देणार व लिहुन घेणार हे एकाच घरात रहातात व एकमेकांस नेहमीच सहकार्य करतात तसेच त्यांचे आपसात अतिशय प्रेमाचे संबंध आहेत. लिहून घेणार यांचेवर लिहुन देणार यांचे नैसर्गिक प्रेम आहे. सदर नैसर्गिक प्रेमापोटी लिहून देणार यांनी लिहुन घेणार यांना वर कलम १ब मधील मिळकत बक्षिस देण्याचे ठरविले व

सदरचे बक्षिस स्विकारण्याचे लिहून घेणार यांने मान्य केले. त्यानुसार प्रस्तुतचा बक्षिसपत्राचा दस्त लिहुन दिला असुन या बक्षिस पत्राने वर कलम १अ मधील मिळकती पैकी वर कलम १ब मधील मिळकत लिहुन घेणार यांस कायमची, विनाशर्त, विनाअट, विनामोबदला अशी बक्षिस दिलेली आहे.

६) संमती देणार ही लिहुन देणार यांची पत्नी असुन लिहुन देणार यांनी वर कलम १ब मधील मिळकत लिहुन घेणार यांना बक्षिस देण्यास संमती देणार यांची संमती असुन भविष्यात लिहुन घेणार यांचे मालकी हक्कात कुठलीही कमतरता राहु नये म्हणुन संमती देणार यांनी या दस्तात सामील होवुन प्रस्तुत बक्षिस पत्रास संमती दिलेली आहे.

७) वर कलम १अ मधील मिळकती पैकी वर कलम १ब मधील क्षेत्र लिहुन देणार यांनी संमती देणार यांचे संमतीने लिहुन घेणार यांना विनाशर्त, विनाअट, विना मोबदला कायम स्वरुपी बक्षिस दिलेले आहे.

८) वर कलम १ब मधील मिळकतीचा प्रत्यक्ष व खुला कबजा लिहुन देणार यांनी संमती देणार यांचे संमतीने लिहुन घेणार यांना प्रस्तुत दस्त नोंदण्यास येण्या पुर्वी प्रत्यक्ष जागेवर जावुन साक्षीदारासमक्ष दिला असुन सदरचा कबजा लिहुन घेणार यांनी मालक म्हणुन स्विकारलेला आहे.

९) वर कलम १ब यात वर्णन केलेल्या मिळकतीचा लिहुन घेणार हा मालक व कबजेदार असुन मिळकतीचा लिहुन घेणार याने वंशरपरांपरा लेकराचे लेकरी निंरतर असा लिहुन घेणार याचे इच्छे प्रमाणे पाहिजे तसा उपभोग घ्यावा अगर त्याची विक्री विल्हेवाट करावी. त्याचेशी लिहुन देणार यांचा, संमती देणार यांचा अथवा त्यांचे वालीवारसांचा संबध राहिलेला नाही.

१०) वर कलम १अ व १ब मधील मिळकत पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची अशी असुन मिळकतीवर लिहुन देणार यांनी कुठल्याही प्रकारचे बोजे जसे दान, गहाण, लिन, लिज, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, जप्ती, जामिनकी, मुखत्यार पत्र, अधिकार पत्र, खाजगी, सहकारी, सरकारी वित्तीय संस्थेचा कर्जाचा अगर तारणाचा बोजा या अगर कुठल्याही जडजोखामांत गुंतविलेली नाही तसेच मिळकती बाबत कोणाही बरोबर कुठल्याही प्रकारचे करार मदार लेखी अगर तोंडी केलेले नव्हते व नाहीत. मिळकती अन्य कोणासही कोणत्याही दस्ताने दिलेली नव्हती व नाही. मिळकती बाबत कुठल्याही न्यायालयात वाद प्रलंबीत नाही अगर मिळकत बक्षिस देवु नये

असा मनाई हुकूम माझेवर बजावण्यात आलेला नाही. मिळकत लिहुन देणार यांची स्वकष्टार्जीत असल्याने मिळकतीची लिहुन देणार यांना त्यांचे इच्छे प्रमाणे विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे.

११) वर कलम १ब मधील मिळकती संबधात मी आज पावेतोचे हरएक प्रकारचे कर भरुन दिलेले आहेत यापुढे लिहुन घेणार यानें वर कलम १ब मधील क्षेत्रा बाबतचे हरएक प्रकारचे कर मालक म्हणुन भरण्याचे आहे.

१२) प्रस्तुत बक्षिस पत्राचे आधारे वर कलम १अ मधील मिळकतीचे ७/१२ उताऱ्यास लिहुन घेणार यांनी त्यांना बक्षिस दिलेले क्षेत्र म्हणजेच वर कलम १ब मधील मिळकतीस मालक व कबजेदार सदरी दाखल करुन घ्यावे त्यास लिहुन देणार व संमती देणार यांची संमती आहे.

१३) प्रस्तुतचे बक्षिस पत्र हे विनाशर्त कायमचे असे लिहुन दिले असुन ते रद्द करण्याचा अथवा मिळकती परत घेण्याचा हक्क लिहुन देणार यांनी राखुन ठेवलेला नाही.

१४) प्रस्तुत बक्षिस पत्राकामी होणारा सर्व खर्च जसे स्टॅम्प, लिहीणावळ, नोंदणावळ हा लिहुन देणार यांनीच केलेला केलेला आहे.

हे बक्षिस पत्र लिहुन देणार व संमती देणार यांनी राजीखुशीने स्वसंतोषाने मजकुर वाचुन व समजावुन घेवुन लिहुन दिले असुन याखाली लिहुन देणार व संमती देणार यांनी आपआपल्या सह्या साक्षीदारासमक्ष केल्या असुन लिहुन घेणार यांनी देखील बक्षिस स्विकारल्या बद्दल त्याची सही साक्षीदारासमक्ष केली आहे.

हे बक्षिस पत्र
ता.म.

**लिहुन देणार**
श्री. प्रशांत ओंकार पाटील ________________

**संमती देणार**
सौ. शितल प्रशांत पाटील ________________

सदरचे बक्षिस मी स्विकारले

**लिहुन घेणार**

श्री. विश्वजित सतिश पाटील ________________

**साक्षीदार**

१.________________________

२.________________________